मंत्रालयीन सेवा
जनहिताय सर्वदा

सत्यमेव जयते

स्वराज्य श्रीराज्याभिषेक शके ३५०

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग,**
**दालन क्र ७-एम.ए, पोटमाळा, मादाम कामा रोड,**
**हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०० ०३२.**

दूरध्वनी क्रमांक : ०२२-२२०२३४४५ ई-मेल: deskm१२३.rfd-mh@gov.in

क्रमांक: मुद्रांक-२०२३/प्र.क्र.३४२/म-१(धोरण) दिनांक:- २९ नोव्हेंबर,२०२३

प्रति,

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे

विषय :- राज्यात मुद्रांक शुल्क दंड सवलत “अभय योजना-२०२३” राबविण्याबाबत.

महोदय,

महसूल (मुद्रांक शुल्क व नोंदणी) विभागाने मंत्रिमंडळाच्या दि.२९ नोव्हेंबर, २०२३ रोजी झालेल्या बैठकीत उपरोक्त विषयी सादर केलेल्या प्रस्तावावर चर्चा होऊन मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाची प्रत सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. तरी, प्राप्त निर्देशानुसार उक्त निर्णयास अनुलक्षून शासन राजपत्रात प्रसिध्द करावयाच्या आदेशाचे इंग्रजी व मराठी भाषेतील प्रारुप तातडीने शासनास सादर करण्याची विनंती आहे.

आदरपूर्वक !

आपला,

(प्रितमकुमार जावळे)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत:-

निवड नस्ती, कार्यासन म-१ (धोरण) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

## मंत्रिमंडळ बैठकीचे प्रारुप इतिवृत्त

**विषय:- महाराष्ट्र राज्यात "महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजना- २०२३" लागू करण्याबाबत...**

महसूल (मुद्रांक शुल्क व नोंदणी) विभागाने मंत्रिमंडळाच्या दि.२९ नोव्हेंबर, २०२३ रोजी झालेल्या बैठकीत उपरोक्त विषयी सादर केलेल्या प्रस्तावावर चर्चा होऊन मंत्रिमंडळाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

१) महाराष्ट्र राज्यामध्ये "महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजना- २०२३" दि.०१ डिसेंबर, २०२३ ते दि.३१ जानेवारी, २०२४ आणि दि.०१ फेब्रुवारी, २०२४ ते दि.३१ मार्च, २०२४ अशा दोन टप्प्यात राबविण्यात यावी.

२) उक्त अभय योजना ही केवळ शासनमान्य मुद्रांक विक्रेत्यांकडून किंवा मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या किंवा त्यांच्या अधिनस्त असलेल्या सक्षम प्राधिकाऱ्याने मंजूर केलेल्या यंत्रणेमार्फत विक्री केलेल्या कोणत्याही रकमेच्या मुद्रांक पेपरवर निष्पादित केलेल्या खालील प्रकारच्या दस्तांकरीता लागु राहील:-

(क) निवासी किंवा अनिवासी किंवा औद्योगिक वापराच्या प्रयोजनार्थ निष्पादित करण्यात आलेले अभिहस्तांतरणाचे तथा विक्री करारपत्राचे किंवा भाडेपट्ट्याचे दस्त; विक्रीचे प्रमाणपत्र; साठेखत; बक्षिसपत्र; हक्कविलेख-निक्षेप, तारण किंवा तारणगहाण यासंबंधीचा करारनामा;

(ख) निवासी वापराच्या प्रयोजनार्थ असलेल्या स्थावर मालमत्तेच्या भाडेदारीच्या हस्तांतरणाचे दस्त तसेच, नवनिर्मित महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ व त्याच्या अधिनस्त विभागीय मंडळे (म्हाडा) व सिडकोकडून वाटप करण्यात आलेल्या किंवा झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरणाने मंजूर केलेल्या योजनेंतर्गत झोपडपट्टी धारकाला पुर्नवसनापोटी वाटप करण्यात आलेल्या निवासी किंवा अनिवासी गाळे तथा सदनिकांच्या अभिहस्तांतरणाचे दस्त तसेच, मानीव अभिहस्तांतरणाकरीता प्रलंबित असलेल्या नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील निवासी किंवा अनिवासी गाळे तथा सदनिकांच्या अभिहस्तांतरणाचे दस्त;

(ग) जुन्या मोडकळीस आलेल्या किंवा अन्य प्रकारे पुर्नविकास करणे आवश्यक आहे, अशा इमारतींचा किंवा स्थावर मालमत्तेचा पुर्नविकास करण्याच्या अनुषंगाने निष्पादित करण्यात आलेले विकसन करारनाम्याचे किंवा तिच्या विक्रीचे किंवा तिच्या हस्तांतरणाचे किंवा संबंधित विकासकाला प्राधिकार देण्याबाबतचे दस्त;

(घ) कंपन्यांच्या एकत्रिकरण किंवा पुर्नरचनेच्या बाबतीतील संलेख तथा दस्त;

(ङ) नवनिर्मित महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ व त्याच्या अधिनस्त विभागीय मंडळे (म्हाडा), शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित, महानगरपालिका/ नगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायती, शासनामार्फत विहित केलेल्या विनिमयाअंतर्गत मंजूर करण्यात आलेली तथा गठीत करण्यात आलेली विविध विकास/नियोजन प्राधिकरणे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण इत्यादी प्राधिकरणांच्या मार्फत निष्पादित केलेले विविध प्रकारचे दस्त;

३) नवनिर्मित महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ व त्याच्या अधिनस्त विभागीय मंडळे (म्हाडा), शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित, महानगरपालिका/ नगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायती, शासनामार्फत विहित केलेल्या विनिमयाअंतर्गत मंजूर करण्यात आलेली तथा गठीत करण्यात आलेली विविध विकास/नियोजन प्राधिकरणे, शासकीय जमिनीवरील सहकारी गृहनिर्माण संस्था यांचेमार्फत निवासी

किंवा अनिवासी प्रयोजनार्थ निष्पादित केलेल्या प्रथम वाटपपत्र किंवा शेअर्स सर्टिफिकेट या संलेख तथा दस्तांव्यतिरिक्त, मुद्रांक न-लावलेले तसेच, साध्या कागदावर निष्पादित केलेले संलेख तथा दस्त, "महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजना- २०२३" खालील कोणत्याही लाभासाठी पात्र असणार नाहीत.

४) उक्त निर्णयासापेक्ष, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या विविध कलमांतर्गत मुद्रांक शुल्क व दंड वसूलीच्या अनुषंगाने कार्यवाही सुरू असलेल्या प्रलंबित प्रकरणी मुद्रांक शुल्क व दंडामध्ये माफी देण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे:-

(१) दि.०१ जानेवारी.१९८० ते दि.३१ डिसेंबर,२००० या कालावधीत निष्पादित केलेले परंतू नोंदणीस दाखल केलेले किंवा न-केलेले दस्त, यांच्याबाबतीत देय होणाऱ्या तथा वसुली पात्र संपूर्ण मुद्रांक शुल्क आणि त्यावर लागु होणाऱ्या दंडामध्ये खालीलप्रमाणे सुट तथा सवलत लागु करण्यात यावी:-

**(अ) योजनेच्या पहिल्या टप्प्यात:-**

| **देय होणाऱ्या तथा वसुली पात्र मुद्रांक शुल्काची रक्कम** | **देय होणाऱ्या तथा वसुली पात्र मुद्रांक शुल्कामध्ये द्यावयाची सुट** | **देय होणाऱ्या तथा वसुली पात्र संपूर्ण मुद्रांक शुल्कावर लागु होणाऱ्या दंडामध्ये द्यावयाची सुट** |
|---|---|---|
| रु. १/- ते रु.१,००,०००/- | १०० टक्के | प्रत्यक्षात देय होणाऱ्या तथा वसुली पात्र संपूर्ण मुद्रांक शुल्कावर लागु होणाऱ्या दंडामध्ये १०० टक्के सुट देण्यात यावी. |
| रु.१,००,००१/- व त्यापेक्षा अधिक | ५० टक्के | प्रत्यक्षात देय होणाऱ्या तथा वसुली पात्र संपूर्ण मुद्रांक शुल्कावर लागु होणाऱ्या दंडामध्ये १०० टक्के सुट देण्यात यावी. |

**(आ) योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात:-**

| **देय होणाऱ्या तथा वसुली पात्र मुद्रांक शुल्काची रक्कम** | **देय होणाऱ्या तथा वसुली पात्र मुद्रांक शुल्कामध्ये द्यावयाची सुट** | **देय होणाऱ्या तथा वसुली पात्र संपूर्ण मुद्रांक शुल्कावर लागु होणाऱ्या दंडामध्ये द्यावयाची सुट** |
|---|---|---|
| रु. १/- ते रु.१,००,०००/- | ८० टक्के | प्रत्यक्षात देय होणाऱ्या तथा वसुली पात्र संपूर्ण मुद्रांक शुल्कावर लागु होणाऱ्या दंडामध्ये ८० टक्के सुट देण्यात यावी. |
| रु.१,००,००१/- व त्यापेक्षा अधिक | ४० टक्के | प्रत्यक्षात देय होणाऱ्या तथा वसुली पात्र संपूर्ण मुद्रांक शुल्कावर लागु होणाऱ्या दंडामध्ये ७० टक्के सुट देण्यात यावी. |

(२) दि.०१ जानेवारी,२००१ ते दि.३१ डिसेंबर,२०२० या कालावधीत निष्पादित केलेले परंतू नोंदणीस दाखल केलेले किंवा न-केलेले दस्त यांच्याबाबतीत देय होणाऱ्या तथा वसुली पात्र संपूर्ण मुद्रांक शुल्क आणि त्यावर लागु होणाऱ्या दंडामध्ये खालीलप्रमाणे सुट तथा सवलत लागु करण्यात यावी:-

**(अ) योजनेच्या पहिल्या टप्प्यात:-**

| **देय होणाऱ्या तथा वसुली पात्र मुद्रांक शुल्काची रक्कम** | **देय होणाऱ्या तथा वसुली पात्र मुद्रांक शुल्कामध्ये द्यावयाची सुट** | **देय होणाऱ्या तथा वसुली पात्र संपूर्ण मुद्रांक शुल्कावर लागु होणाऱ्या दंडामध्ये द्यावयाची सुट** |
|---|---|---|
| रु. १/- ते रु.२५,००,००,०००/- | २५ टक्के | ५) प्रत्यक्षात देय होणाऱ्या दंडाची रक्कम ही रु.२५,००,०००/- (रुपये पंचविस लाख अक्षरी) पेक्षा कमी असल्यास देय होणाऱ्या तथा वसुली पात्र संपूर्ण मुद्रांक शुल्कावर लागु होणाऱ्या दंडामध्ये ९० टक्के सुट देण्यात यावी.<br>६) दंडाची रक्कम रु.२५,००,०००/- (अक्षरी रुपये पंचविस लाख) पेक्षा जास्त असल्यास केवळ रु.२५,००,०००/- (रुपये पंचविस लाख अक्षरी) रक्कम दंड म्हणुन स्विकारण्यात येऊन उर्वरित दंडाच्या रक्कमेची सुट देण्यात यावी. |
| रु. २५,००,००,००१/- पेक्षा जास्त | २० टक्के | रु.१,००,००,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी) रक्कम दंड म्हणुन स्विकारण्यात येऊन उर्वरित दंडाच्या रक्कमेची सुट देण्यात यावी. |

**(आ) योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात:-**

| देय होणाऱ्या तथा वसुली पात्र मुद्रांक शुल्काची रक्कम | देय होणाऱ्या तथा वसुली पात्र मुद्रांक शुल्कामध्ये द्यावयाची सुट | देय होणाऱ्या तथा वसुली पात्र संपूर्ण मुद्रांक शुल्कावर लागु होणाऱ्या दंडामध्ये द्यावयाची सुट |
|---|---|---|
| रु. १/- ते रु.२५,००,००,०००/- | २० टक्के | ५) प्रत्यक्षात देय होणारी दंडाची रक्कम ही रु.५०,००,०००/- (अक्षरी रुपये पन्नास लाख) पेक्षा कमी असल्यास देय होणाऱ्या तथा वसुली पात्र संपूर्ण मुद्रांक शुल्कावर लागु होणाऱ्या दंडामध्ये ८० टक्के सुट देण्यात यावी.<br>६) दंडाची रक्कम ही रु.५०,००,०००/- (अक्षरी रुपये पन्नास लाख) पेक्षा जास्त असल्यास केवळ रु.५०,००,०००/- (अक्षरी रुपये पन्नास लाख) रक्कम दंड म्हणुन स्विकारण्यात येऊन उर्वरित दंडाच्या रक्कमेची सुट देण्यात यावी. |
| रु. २५,००,००,००१/- पेक्षा जास्त | १० टक्के | रु.२,००,००,०००/- (अक्षरी रुपये दोन कोटी) रक्कम दंड म्हणुन स्विकारण्यात येऊन उर्वरित दंडाच्या रक्कमेची सुट देण्यात यावी. |

५) मंत्रिमंडळाच्या वर नमूद निर्णयासापेक्ष मंत्रिमंडळाच्या बैठकीचे इतिवृत्त अंतिम होण्याची वाट न-पाहता महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करावयाच्या आदेश विधी व न्याय विभागाशी विचारविनिमय करुन संचालक, मराठी भाषा संचालनालय, मुंबई यांच्याकडून मराठी भाषेत भाषांतरीत करुन तात्काळ प्रसिध्द करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**(डॉ.राजगोपाल देवरा)**
**अपर मुख्य सचिव (महसूल,मुद्रांक शुल्क व नोंदणी)**
**महसूल व वन विभाग**

**मा.मुख्य सचिव**